# नामदार गोखल्यांच्या आर्थिक विचारांचे द्रष्टेपण

**नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या स्मृतिशताब्दीची सांगता शुक्रवारी (ता. १९ फेब्रुवारी) झाली. त्यानिमित्त त्यांच्या आर्थिक विचारांविषयी.**

**डॉ. अतुल देशपांडे**

गोखल्यांच्या आर्थिक विचारांवर त्यांचे गुरू महादेव गोविंद रानडे आणि जर्मन अर्थशास्त्रज्ञ फ्रेड्रिक लिस्ट या दोघांच्या विचारसरणीचा प्रभाव आहे. रानड्यांच्या मते राजकीय अर्थव्यवस्थेतील गृहितके, विधाने ही युक्लिडियन भूमितीतील वैश्विक सत्याप्रमाणे नसतात. जे व्यापारी धोरण इंग्लंडला लागू होईल, तेच भारताला लागू होईल, असे नाही. खुल्या व्यापारामुळे भारताचे नुकसान जास्त होईल, असे गोखल्यांचे त्या वेळी मत होते. एका बाजूला खुल्या व्यापाराला विरोध करून अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी देशांतर्गत विकास कसा महत्त्वाचा आहे, याचे गोखले विवेचन करतात. आताची 'मेक इन इंडिया'ची कल्पना या विचारांशी सुसंगत आहे. गोखले यांच्या मते शेती आणि उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी आणि उत्पादन आणि वितरणासाठी राज्याचा हस्तक्षेप असला पाहिजे. आज खुल्या व्यापारातून विकसनशील देशांना काही अंशी निश्चित आर्थिक फायदा झाला. मात्र, खुला व्यापार पूर्णपणे खुला नाही. निरनिराळे देश आजही संरक्षण धोरणाचा आधार घेऊन खुल्या व्यापार प्रक्रियेत अडथळे आणतात. जागतिकीकरण आणि खुल्या व्यापारातून जगात आर्थिक विषमता वाढत आहे, असाही एक सिद्धांत मांडला जातो. त्यादृष्टीने देखील गोखल्यांचा शेती आणि उद्योगाविषयीचा विचार आजही महत्त्वाचा वाटतो.

गोखल्यांच्या मते देशांतर्गत आर्थिक विकास शेती आणि उद्योग क्षेत्रातील उत्पादन वाढवून शक्य आहे. भारतातील दारिद्र्याला जसे ब्रिटिशांचे आर्थिक धोरण कारणीभूत आहे, त्याचप्रमाणे भारतातील कृषी व्यवस्था सातत्याने मंदीसदृश परिस्थितीत असणे हेदेखील कारण आहे, असे गोखल्यांचे मत होते. त्यांच्या मते शेतकऱ्यांच्या एकूण कर्जपुरवठ्यात वाढ झाली पाहिजे. सावकार आणि



गोपाळ कृष्ण गोखले

जमीनदार यांच्या कर्जाच्या सापळ्यातून शेतकरी मुक्त झाला पाहिजे. कृषी उद्योग बँकेची स्थापन केली पाहिजे. तसेच शेतीमध्ये यंत्रोपकरणांचा वापर करून, ती कशी वापरावीत यासंबंधी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. शेती मागास राहिली आणि त्यावर अवलंबून लोकांचे शेतीवरील ओझं वाढत गेले, तर लोक उद्योग व्यवसायाकडे वळतील. मात्र, अशावेळी उद्योग व्यवसाय क्षेत्र मागास असेल आणि जागतिक स्पर्धेला सामोरे जायचे असेल, तर त्याची प्रगती व्हायला पाहिजे. गोखल्यांचे हे विचार आजच्या शेतीविषयक परिस्थितीमध्ये आणि उद्योग क्षेत्रातील होणाऱ्या मंदवृद्धीमुळे अधिक उपयुक्त आहे, असे दिसते. शेतकऱ्यांची कर्जमाफी, 'विशेष आर्थिक पॅकेज', शेतकऱ्यांच्या आत्महत्या या गोष्टी सुरूच आहेत. आर्थिक वृद्धीदर आणि किंमत वाढीचा दर यात मेळ घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेला आजही अन्नधान्याच्या किमतीवर लक्ष ठेवावे लागते. त्यामुळे गोखल्यांनी त्या काळात सूचविलेले आर्थिक विचार हे शेती आणि उद्योग क्षेत्राच्या संदर्भात आजही प्रस्तुत आहेत. कृषी उद्योगाच्या वृद्धीसाठी औद्योगिक विकासाची गरज आहे, हे सांगताना गोखले एतद्देशीय भांडवलवादाचा विचार मांडतात. त्यांच्या मते स्वदेशी म्हणजे परकीय वस्तूंवर बहिष्कार हे धोरण नव्हे. स्वदेशीचा विचार गोखले दोन अंगांनी करतात. एक म्हणजे स्वदेशीची चळवळ ही देशाभिमानाची चळवळ आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्वदेशीची चळवळ ही आर्थिक विकासाची चळवळ आहे. गोखल्यांच्या मते, स्वदेशीतून देशांतर्गत उत्पादनाला मागणी येऊन देशांतर्गत उपभोग वाढेल. यातून देशांतर्गत उद्योग आणि उत्पादनाला चालना मिळेल. उत्पादनाचा प्रश्न हा भांडवल, संयोजन आणि कौशल्य या तीन प्रमुख उत्पादन घटकांसंबंधीचा प्रश्न आहे. या तीनपैकी कोणत्याही एका गोष्टीसाठी प्रयत्न करणारा श्रमिक हा स्वदेशीच्या उद्दिष्टासाठी झटतो आहे, असे म्हणावे लागेल, असे त्यांना वाटायचे. जागतिकीकरणाच्या रेट्यात स्वदेशी संकल्पना मागे पडणे स्वाभाविक आहे. मात्र, आज आवश्यक असलेल्या आर्थिक विस्ताराच्या पर्यावरणात वस्तू व सेवांचे स्वरूप त्या उत्पादित करण्यासाठी लागणाऱ्या अन्य वस्तू, प्रक्रिया, उत्पादनपद्धती, बाजार, भांडवल या सर्वच घटकांच्या गरजेतून स्वदेशीचा नीट अर्थ उमगणे गरजेचे आहे.

भारतीय शेती आणि उद्योगाच्या प्रगतीचे वैशिष्ट्य पूर्ण करण्यासाठी ब्रिटिश अमलाखाली असलेल्या भारतीय वित्तव्यवस्थेचे त्यामधील सार्वजनिक आय-व्ययाचं आणि राजकोषीय धोरणाचे स्वरूप कसे असावे, यासंबंधी देखील गोखल्यांनी विस्तृत विवेचन केले. सरकारच्या खर्चातील वाढ उत्पन्नातील वाढीपेक्षा जास्त आहे, हे पाहिल्यानंतर सरकारने अंदाजपत्रक समतोल ठेवावे, अशी सूचना गोखले करतात. तसेच सर्वसामान्य व्यक्तीचे अंदाजपत्रक तुटीचे असताना, सरकारचे अंदाजपत्रक शिलकी असू नये. सरकारने लोकांसाठी त्यासंदर्भात उपाययोजना कराव्यात, असेही गोखले सुचवितात. सरकार शेतकऱ्यांकडून गोळा करीत असलेल्या जमीन महसुलात २५ ते ३० टक्के कपात करावी. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी काही दशलक्ष पाऊंड स्टर्लिंग निधी उभा करावा. सहकारी क्रेडिट सोसायट्यांचे जाळे उभे करून इजिप्शियन बँकांच्या धर्तीवर कृषी बँकांची स्थापना करावी. औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी अंदाजपत्रकात वाढीव खर्चाची तरतूद असावी. प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय स्थितीत सुधारणा व्हावी, अशा काही मूलगामी सूचना त्यांनी केल्या. आयातीवरील कराशी समतोल साधण्यासाठी या कराचे ब्रिटिशांनी नियोजन केल्याचे गोखल्यांचे मत होते. त्यांचा कल्याणकारी राज्याचा विचार सध्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. विकसनशील व गरीब देशांत सरकारची भूमिका अधिक जबाबदारीची असली पाहिजे, हा विचार गोखल्यांनी त्यावेळेस मांडला. ते अर्थव्यवस्थेला समाजव्यवस्थेचे एक अंग मानतात. त्यामुळे त्यांनी सुचविलेल्या सामाजिक सुधारणांमधूनदेखील त्यांचे आर्थिक विचार व्यक्त होतात. त्यांचा उदारमतवाद आर्थिक विचारातही प्रतिबिंबित होतो. आपले आर्थिक विचार प्रत्यक्षात उतरविण्यासाठी संविधानात्मक चळवळीच्या साधनांचा उपयोग करायला हवा, असे ते म्हणत. आज भूसंपादन कायद्याच्या संदर्भात संविधानात्मक चळवळीची भूमिका कशी महत्त्वाची ठरते, याची सहजच जाणीव होते.